सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३१०

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.निरंजन सुरेश आवटी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज प्रभाग समिती क्र.४ च्या क्षेत्रातील कर्मवीर भाऊराव पाटील चौक येथील स.न.१ आणि ५ पैकी या मनपाच्या स्टेडीयम आरक्षण असलेल्या जागेला श्री.छत्रपती संभाजी महाराजांची तेजोमय कार्यर्किद आजच्या पिढीस ज्ञात होणेसाठी श्री.छत्रपती संभाजी महाराज क्रिडा नगरी असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.रोडजी मोहिते. D/Suryavanshi महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३११

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संदीप सुरेश आवटी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज प्रभाग समिती क्र.४ च्या क्षेत्रातील वॉर्ड क्र.३ कमान वेस ते मनोज शिंदे यांचे निवासस्थान या मार्गास आरोग्य सेवेसाठी मोठे योगदान दिलेले डॉ.रिचर्डसन या महान व्यक्तीची सदैव आठवण राहणेसाठी डॉ.रिचर्डसन मार्ग असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.संजय चंद्रकांत कुलकर्णी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली प्रभाग क्र.१९ मधील स्टेट बँक,विश्रामबाग शाखा ते पुढे पुर्वेला जाणारा खरे पार्किंग पर्यतच्या रस्त्याला निर्भय दत्त मंदिर रोड असे नामकरण करणेस या परिसरातील नागरिक वांरवांर मागणी करीत असल्याने, सदर ठिकाणी निर्भय दत्त मंदिर रोड असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.संजय कुलकर्णी

अनुमोदक :- श्री.मैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Survavanshi

महापौर,

महानगरपालिका सांगली

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३१२

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संदीप सुरेश आवटी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज प्रभाग समिती क्र.४ च्या क्षेत्रातील वॉर्ड क्र.३ कमान वेस येथे आरोग्य सेवेसाठी मोठे योगदान दिलेले डॉ.रिचर्डसन यांनी १०० वर्षापूर्वी शाळा सुरु केली होती. त्यामुळे या महान व्यक्तीच्या कार्याची आठवण सदैव रहावी यासाठी कमान वेस ते तानाजी चौक या मार्गास कॅमरन स्कूल अॅन्ड चर्च रोड असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान — ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.गजानन मोहिते — D.P.Suryavanshi महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३१३

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१७ मधील दिलीप टायर्स ते १०० फुटी रोड पर्यंतच्या रस्त्यास निसर्ग प्रेमी शिवाजी ओऊळकर मार्ग असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.धिरज चंद्रकांत सुर्यवंशी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील पोरेज टीव्हीएस शोरुम ते शासकीय विश्रामगृह-पाटीदार भवन-नंदादिप आय हॉस्पिटल-महसुल भवन-सर्किट हाऊस-आयुक्त निवास ते न्यु प्राईड मल्टिप्लेक्स ते बायपास रोड या मार्गास थोर समाज सुधारक सदगुरु श्री.वामनराव पै मार्ग असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन आगवान. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.धिरज सुर्यवंशी D.P.Suryavanshi
महापौर,

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

ठराव क्रमांक :- ३१४

विषय क्रमांक :- १ (ज)

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य पै.रणजितसिंह संभाजीराव पाटील (सावर्डेकर) यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली फौजदार गल्ली परिसरातील पै.जोतीरामदादा पाटील सावर्डेकर मार्गाच्या दुतर्फा असणाऱ्या गल्ल्यांना फौजदार गल्ली क्र.१ ते ६ असे क्रमांक देणेकामी मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान — ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते

D. P. Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३१५

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.गिता सुयोग सुतार यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रामध्ये तसेच सांगली जिल्ह्यामध्ये राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचे कोठेही स्मारक नाही. त्यांचे कार्य व शिकवण नागरिकांचे मध्ये रुजविणेकरीता तसेच भावी तरुण त्यांनी केलेली सेवा याचा आदर्श घेणेसाठी सांगली येथील सि.स.नं.१२३६७, १०० फुटी रोड जवळील महापालिकेच्या जागेमध्ये राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचे स्मारक बांधणेसाठी निर्णयार्थ आलेल्या प्रस्तावास सन्मा.सदस्य श्री.लक्ष्मण शिवराम नवलाई यांनी विरोध दर्शविल्यामुळे सदरचा प्रस्ताव ही सभा रद्द करीत आहे.

सूचक :- सौ.मैनुद्दीन बागवान — ठराव बहुमताने मंजुर

अनुमोदक :- सौ.नोडणी मोहिते — महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३१६

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील स्वर्गीय मदनभाऊ पाटील स्मारक चौक येथे स्वर्गीय मदनभाऊ पाटील यांचा पुर्णाकृती पुतळा व स्मारक उभारणेत आलेले आहे. या स्मारकाची व उद्यानाची देखभालीसाठी विना मोबदला मिळणेबाबत श्री.विश्वनाथराव शामराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट,सांगली यांनी मागणी केली असून, सदर कामी लागणारे मनुष्यबळ सदर संस्था पुरविणेस तयार आहे. सदर स्मारकाच्या देखभालीचे काम सदर चॅरिटेबल स्ट्रट यांना दिल्यास स्मारकाची चांगल्या प्रकारे निगा राखली जावून परिसर स्वच्छता व संरक्षण होणार असलेने, श्री.विश्वनाथराव शामराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट,सांगली यांनी मागणी केलेनुसार विना मोबदला सदर स्मारकाची व उद्यानाची देखभाल करणेसाठी देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उमेश पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२
२५/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३१७

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.सविता शेडजी मोहिते आणि श्री.प्रकाश बाबासो ढंग यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कुपवाड वॉर्ड क्र.१ मध्ये धोंडीकाका नगर मधील स.नं.४७०/४ या जागेवर तातडीने चिल्ड्रन पार्क विकसीत करणेत यावे अन्यथा महिला बाल कल्याण समितीने सदर मान्यता दिलीच नाहीतर कुपवाड वॉर्ड क्र.२ स.नं.१९९/१/६ बजरंगनगर मधील महापालिकेच्या ३५ गुंठ्याच्या खुल्या जागेमध्ये चिल्ड्रन पार्क विकसीत करणेसाठी निर्णयार्थ आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदरचा प्रस्ताव महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीने फेरसादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.सैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शेडजी मोहिते D.P.Suryavanshi महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३१८

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या आस्थापनेवरील कायम सफाई कामगारांना लाड-पागे आयोगाच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नोकरी मध्ये सामावून घेतले जात होते. तथापि, सुधारीत शासन निर्णयानुसार कर्मचारी जर अनुसूचित जाती किंवा म्हेतर समाजाचा असेल तरच अशा कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड-पागे शिफारशीचा लाभ देणेत येत असून, अनुसूचित जाती व म्हेतर समाज यांचे व्यतिरिक्त इतर जातीच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड-पागे शिफारशीचा लाभ दिला जात नाही. सदरची बाब इतर जातीच्या कर्मचाऱ्यांचे वारसावर अन्यायकारक आहे असे या सभेचे मत आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी संपुर्ण आयुष्य सफाई कामगार म्हणून काम केलेले आहे अशा इतर जातीच्या कर्मचाऱ्यांना देखील लाड-पागे शिफारशीचा लाभ देणे आवश्यक असलेने, सफाई कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना लाड-पागे शिफारशीच्या लाभ देणेस मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.जगन्नाथ ठोकळे. महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३१९

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.शासन निर्णय क्र.वाहध-२०२०/प्र.क्र.०३/२०२०/सेवा-५ दि.२० एप्रिल २०२२ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन महापालिकेच्या अंध, अस्थीव्यंगाने अधू आणि कण्याच्या विकाराने पिडीत असणाऱ्या तसेच मुखबधीर / श्रवणशक्तीतील दोष असणाऱ्या कर्मचाऱ्यांना र.रु.२७००/- प्रमाणे वाहतुक भत्ता आदा करणेस तसेच वेळोवेळी मा.शासनाकडून दिव्यांग कर्मचाऱ्यांना मंजूर होणाऱ्या वाहन भत्त्यामधील वाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.सैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. जगन्नाथ ठोकळे.

D.P. Suryavanshi.
महापौर,

प्रशा. अधिकारी

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३२०

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.गजानन रामू मगदूम यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड मधील स.नं.५०९/१/१ (हनुमान नगर व संत रोहिदास समाज महादेव मंदिर परिसर) ही मिळकत मनपाच्या मंजूर नियोजीत विकास आराखड्यामध्ये गार्डन आरक्षण क्र.२८२ नुसार बाधीत होत असून, याभागातील राहते लोकवस्ती वरील उद्यानाचे आरक्षणामध्ये म.प्रा.अ.नं.१९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदलून रहिवास भागामध्ये समाविष्ठ करणेबाबत नागरिकांनी व सदस्यांनी निवेदन दिलेले आहे. सदर सर्व्हे नंबरमध्ये स्वातंत्र काळापासून लोकवस्ती अस्तित्वात आहे. या भागातील नागरिकांनी महानगरपालिकेकडे गुंठेवारी नियमानुकूल प्रस्ताव देखील दाखल केलेले असून, नियमितीकरणाची अंशत: शुल्क ही भरले आहे. तसेच सदर भागातील नागरिकांना घरपट्टी पाणीपट्टी बिले महानगरपालिकेकडे नियमित भरतात. याभागातील रस्ते, गटारी व पाणी या मुलभूत सोयी महानगरपालिकेने पुरविलेल्या आहेत. परंतु, महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यानुसार या भागातील बहुतांश नागरिकांच्या मिळकतीवर उद्यानांचे आरक्षण ठेवणेत आलेले असल्यामुळे त्यांना गुंठेवारी प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत. तसेच कुपवाड शहरात अन्य ठिकाणी महानगरपालिकेच्या खुलया जागा असून त्या ठिकाणी गार्डन विकसीत करणे शक्य होणार असून, या १००% रहिवासी भागाचे पुनर्वसन करणे अशक्य आहे. त्यामुळे नागरिकांचे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मा.शासनाकडे पाठविणेस व सदर भागातील नागरिकांना गुंठेवारी प्रस्ताव दाखल करणे व मा.शासन मान्यतेच्या अधीन राहून गुंठेवारी भागातील नागरिकांना प्रमाणपत्र देणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, महापालिका क्षेत्रात सर्व्हे करुन, ज्या आरक्षित जागेवर नागरिकांनी १००% घरे बांधलेली आहेत अशा जागांचा प्रभाग समिती निहाय अहवाल नगररचना विभागाने महासभेकडे सादर करावा असे ही आदेशित करीत आहे.

महानगरपालिका सभा आदेशित

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते

D. P. Suryavanshi
प्रशासक

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३२१

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संदीप सुरेश आवटी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज प्रभाग समिती क्र.४ मिरज येथील मंगळवार पेठ गोसावी गल्ली व जिजामाता चौक या परिसरास आरक्षण क्र.४९९ मैदानाचे व आरक्षण क्र.५०० बगीचाचे पडलेले आहे. या दोन्ही ठिकाणी १०० हुन अधिक नागरिकांची लोकवस्ती आहे. तेथील नागरिक हे मोजमजूरी करुन आपला उदरनिर्वाह करणारे गोरगरीब कुटूंबातील आहेत. जर तेथील मैदानाचे व बगीचाचे आरक्षण कायम झालेस या परिसरातील नागरिकांचे संसार उघड्यावर पडणार आहेत. या परिसरातील नागरिकांना महानगरपालिकेमार्फत मुलभूत सोईसुविधा पुरविल्या जातात. महानगरपालिकेकडून त्यांना नळपाणी बिले,घरपट्टी बिले ही आकारली जातात व तेथील नागरिक ही वेळेवर कर भरुन महानगरपालिकेस सहकार्य करीत आहेत. तरी मिरज येथील मंगळवार पेठ गोसावी गल्ली व जिजामाता चौक या परिसरास आरक्षण क्र.४९९ मैदानाचे व आरक्षण क्र.५०० बगीचाचे आरक्षण हे दोन्ही आरक्षण उठवून नागरिकांचे वास्तव्यास रहिवासयुक्त करणेबाबत निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन जाजावान. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.सोडजी मोहिते

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३२२

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.निरंजन सुरेश आवटी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज प्रभाग समिती क्र.४ च्या क्षेत्रातील मिरज कर्मवीर भाऊराव चौक येथील स.नं.१ आणि ५ पैकी या मनपाच्या स्टेडियम जागेवर श्री.छत्रपती संभाजीराजे महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा चबुतऱ्यासह बसविणेस व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.पुतळा-३११६/प्र.क्र.३०८/२९ मंत्रालय मुंबई यांचे मार्गदर्शक तत्वानुसार पुतळा समिती स्थापन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.रोजी मोहिते.

D.P.Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२०/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३२३

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली येथील स.नं.३३८,३७०,३७१,३७२,३७३,३३५(चालू विभाजनानंतरचे नविन स.नं.७५,८५, ८६,८७,८८) या मिळकतीमधून १०० फुटी रस्ता ते इनामधामणी रस्त्यास जोडणारा नियोजित २४.४० मी.रुंदीचा रहिवासी भागातून दर्शविलेला रस्ता रद्द करणेबाबत नागरिकांची मागणी आहे. सदर भागातील कित्येक नागरिकांच्या मिळकती या बिनशेती झालेल्या असून त्यामध्ये त्यांनी प्रचंड गुंतवणूक करुन इमारती,बंगले,बैठीघरे,अपार्टमेंट इ. चे बांधकाम केलेले आहे व त्या सर्व मिळकतीचे महापालिकेच्या नियमानुसार घरपट्टी व पाणीपट्टी पुर्वीपासून भरत आहेत. तसचे सदरच्या रहिवाशी भागामध्ये १०० फुटी रस्त्यास जोडणारे अनेक अंतर्गत रस्ते आहेत तसेच सदर भागातील बऱ्याच नागरिकांनी गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव महानगरपालिकेकडे दाखल केलेले आहेत. सदर नियोजित रस्त्यामुळे नागरिकांना आर्थिक नुकसान सोसावे लागणार आहे. त्यामुळे हा २४.४० मी.रुंदीचा रस्ता रद्द करुन बाधीत भाग/क्षेत्र रहिवासी भागात समाविष्ठ करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच तत्कालीन नगरपरिषदेने सदरचा नियोजित रस्ता दि.१८/०६/१९९१ रोजीच्या सभेतील ठरावाने रद्द केलेला होता. तसेच, पेठभाग सि.स.नं.८०९,८०९/१ व ८०९/२ सांगली या ठिकाणी दक्षिणोत्तर EPR -२३ अन्वये ६.१० मी.नियोजीत रस्ता रुंदीकरण ऐवजी ४.५० मी दक्षिणोत्तर रस्ता प्रस्तावित करणेत आलेला आहे. उर्वरित अशंत: आबाधीत भाग रहिवाशी विभागात समाविष्ठ करणेत आलेले आहे. तथापि, सदर सि.स.नं.मध्येही मोठ्या प्रमाणावर रहिवाशी भाग असून त्या ठिकाणी नागरिकांनी पक्की घर उभारलेली आहेत त्यामुळे त्यांचेही मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागणार आहे. सदरचे प्रस्तावित नियोजित रस्ते म.प्रा.र.अधि.१९६६ चे कलम ३७(१) अन्वये रहिवास विभागात बदल करणेबाबतचा प्रस्ताव मा.शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोटतुकडी मिरज पैकी कुपवाड हद्दतील जुना स.नं.२०२/२ याचा नविन स.नं.३३५/२ या सर्व्हे नंबर मध्ये १० गुंठे जागेवर कमर्शियल कॉम्प्लेक्सचे आरक्षण असून सदर जागेवर २५ ते ३० वर्षापासून नागरी वस्ती झाली असून, सदर ठिकाणी ५ कुटूंबे रहिवाशी आहेत. महानगरपालिकेच्या वतीने रस्ते,गटारी,पथदिवे इ.सर्व सुविधा पुरविल्या गेल्या आहेत. त्यानुसार ते महानगरपालिकेकडे नियमितपणे घरपट्टी, पाणीपट्टी कर भरत आहेत. सदर जागा संपादीत करुन रहिवाशी नागरिकांना नुकसान भरपाई देणे व्यवहारिक दृष्ट्या शक्य नाही तसेच गुंठेवारी अधिनियम २००१ मधील कलम ५(१) व ५(२) नुसार सदर आरक्षणे रद्द करुन नागरिकांना गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रमाणपत्र देणे व एमआरटीपी ॲक्ट १९६६ मधील कलम ३७ अन्वये आरक्षण फेरफार करण्याच्या अधिन राहून सदर नागरी वस्ती वरील आरक्षण रद्द करणे हे नागरी हिताच्या दृष्टीने व महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने योग्य होणार असलेने, सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

स.उ.नं.२

सूचक :- श्री.विष्णू माने

ठराव सर्वानुमते मंजुर

D P Surywanshi

अनुमोदक :- श्री.सोहनी मोहिते

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३२४

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.संगिता विठ्ठलराव खोत यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज येथील मिरज - कोल्हापुर रोड ख्वॉजा वसाहती मधून जाणारा १०० फुटी रस्ता पुर्णपणे भूसंपादीत करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा रस्ता महानगरपालिकेने पुर्णपणे संपादीत करुन सदर रस्त्यावरील जागा मालकांना टीडीआर / नुकसान भरपाई देवून भूसंपादन केल्यास शहरातील वाहतुकीवरील ताण कमी करता येणार आहे. तरी सदर १०० फुटी रस्त्यावरील संबंधित जागा मालकांना टीडीआर / एफएसआय अथवा नुकसान भरपाई देवून भूसंपादन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री. रोडजी मोहिते महापौर,

स.म.न.र.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२ २७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३२५

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.मुयरेश बाबासो पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

दि.१८/०४/२०२२ रोजीच्या महासभा क्र.२/२०२२-२०२३ च्या सूचना पुरवणी विषयपत्रिकेवरील विषय क्र.३ ला अनुसरुन मा.महासभा ठराव क्र.८२ दि.१९/०७/२००८ अन्वये महापालिकेने मानधनावर दत्तक घेतलेल्या कुस्ती व कबड्डी खेळातील खेळाडूंना महापालिकेच्या सेवेत कायम करणेस मान्यता दिलेली आहे. सबब, महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.नमुंम-१२२१/प्र.क्र.०७/नवि२८ दि.२७ जुलै २०२१ अन्वये नवि मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर करार पद्धतीने (कंत्राट) तात्पुरत्या स्वरुपात वेतनश्रेणी,किमान वेतन व ठोक मानधनावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे महानगरपालिकेच्या सेवेत नियमित समावेशन करण्याबाबत निर्णय झाला आहे. महानगरपालिकेकडील खालील कर्मचारी ही गेली १० वर्ष मानधन तत्वावर वाहनचालक म्हणून काम करीत आहेत. सदर कर्मचाऱ्यांची नेमणूक करतेवेळी रितसर जाहिरात प्रसिद्धी करुन मुलाखती घेवून निवड करणेत आलेले आहेत. त्यानुसार महानगरपालिकेकडील वाहनचालक श्री.अमित गायकवाड,नासिर जांभळीकर,सतिश पवार,रणजित मगदुम,दिलावर जमादार,अभिजीत साळुंखे,संतोष डिग्रजे,विकास आंबी,वसीम मुजावर,सुनिल यादव,आयुब डफेदार,मुस्तकीम पन्हाळकर यांनी गेली १० वर्ष महानगरपालिकेडे प्रामाणिकपणे व आपत्कालीन काळामध्ये काम केलेले असल्याने, वरील सर्व कर्मऱ्यांना शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम स्वरुपी समावेशन करुन घेणेकामी मा.शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार महापालिकेमध्ये कार्यरत असणाऱ्या मानधन,बदली, रोजंदारी तत्वावरील सर्वच कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या आस्थापनावरील रिक्त असलेल्या पदावर कायम स्वरुपी समावेशन करणेस मा.शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मेनुद्दीन भागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.धीरज सुर्यवंशी.

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३२६

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या कु.सोनाली विलास सागरे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.८ मध्ये नागरी वस्ती सुधार योजना लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास निधीमधून डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज मंदिर परिसरात चेनलिंक कंपौंड करणे अंदाजपत्रकीय र.रु.१३,३४,३५७/-मात्रची कामगिरी श्री दत्त मजूर सहकारी संस्था मर्या.मिरज यांना कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,मिरज यांचेकडून मंजूर झालेली आहे. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोसायटी व ओपन स्पेसमधून रस्ता जात असलेमुळे तेथील दोन सोसायटी मधील रहिवाशी नागरिकांनी निवेदनाद्वारे सदर कामास विरोध केला आहे. तरी सदरचे काम रद्द करुन सदर निविदा रक्कमेचे त्याच सोसायटी मधील मनपा मालकीच्या दुसऱ्या ओपन स्पेसमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन,कंपौंड वॉल व स्टेज कट्टा,अंदाजपत्रक करुन नविन प्रस्ताव मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,मिरज यांचेकडे पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.पांडूरंग मार्तंड कोरे यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सन २०२१-२२ करिता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात विशिष्ठ नागरी सेवा व सुविधेची कामे योजनेंतर्गत महापालिका क्षेत्रातील एकूण ०७ कामांसाठी शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१७३(१०५)/नवि-१६ दि.०७ जुलै २०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महानगरपालिकेस र.रु.५ कोटी मंजूर झाले असून, सदर शासन निर्णयाद्वारे सदर कामासाठी कार्यान्वीत यंत्रणा महानगरपालिका असून, महानगरपालिका क्षेत्रातील खालील एकूण ०७ कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम रुपये (लक्ष)
१.	गांधी पुतळा बॉम्बे बेकरी-आळतेकर हॉल दीडी वेस विजापुर वेस-वखारभाग ते शास्त्री चौक रस्ता डांबरीकरण करणे.	१५०.००
२.	हॉटेल सुख निवास-डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान ते परमशेट्टी हॉस्पिटल ते सांगली मिरज रोडपर्यत डांबरीकरण करणे	१००.००
३.	गाडवे पेट्रोल पंप ते बोलवाड रोड (फोड्याची लक्ष्मी रस्ता) डांबरीकरण करणे	५०.००
४.	महात्मा फुले (विवेक कांबळे घर) ते शास्त्री चौक रस्ता डांबरीकरण करणे	७५.००
५.	कमान वेस वाळू डेपो ते सांगलीकर मळा जुना कळंबी रस्ता डांबरीकरण करणे	५०.००
६.	गेस्ट हाऊस समोरील रस्ता ते रमा उद्यान १०० फुटीपर्यत रस्ता डांबरीकरण करणे	२५.००
७.	जुना मालगाव रोड ते इस्कॉन मंदिराकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे	५०.००
	एकूण र.रु. (लक्ष)	**५००.००**

शहर अभियंता

सूचक :- सौ.पद्मश्री पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री.पांडूरंग कोरे

D.P. Surjavanshi
महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३२७

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१४ व्या वित्त आयोगाच्या शासन निर्णयानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालनालय यांचे मान्यते शिवाय सदर निधी खर्च करता येत नाही व संचालनालय यांनी यापूर्वी सांगली येथील वॉर्ड क्र.९ मधील चैत्रबन नाला ते आरवाडे पार्क पर्यतच्या नाल्यासाठी र.रु.१० कोटी खर्च करण्यासाठी मान्यता दिली असून, आता त्यामध्ये बदल करता येणार नाही असे स्पष्ट संकेत दि.२१/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेले आहेत. तरी मा.महासभा ठराव क्र.५५ दि.१९/०७/२०२१ हा रद्द करुन वरील नाल्याच्या बांधकामासाठी निविदा मागविणेस ही सभा मान्यता देत असून, निविदा दर मंजुरीसाठी मा.महासभेसमोर प्रस्तावा सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

तसेच, महापालिका क्षेत्रातील इतर मोठ्या नाल्यांचे तसेच मिरजेतील दोन नाले बांधकाम करणेसाठी व शामरावनगर मधील पाणी निचरा करणेसाठी बांधकाम विभागाने तातडीने सर्व्हे करुन, सदरचे सर्व नाल्यांचे खोली आणि रुंदीने बांधकाम होणेच्या दृष्टीने त्याचे खर्चाचे अंदाजपत्रके तयार करणेत यावेत असे ही सभा आदेशित करीत असून, त्यासाठी १४ वा / १५ वा वित्त आयोग, इस्क्रो अकौंन्ट मधील शिल्लक निधी अथवा जिल्हा नियोजन समिती,केंद्र अथवा राज्य शासन यांचेकडील इतर योजनामधून अथवा अमृत ०.२ योजनेमधून निधी मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सदर सर्व नाल्यांचा DPR तयार करणेसाठी एजन्सी नियुक्त करणेसाठी ही सभा आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

सूचक :- S. Ahmm श्री.संजय मेंढे

ठराव बहुमताने मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री.गजानन मोहिते

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३२८

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विवेक आप्पा कांबळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज येथील वॉर्ड क्र.२० मधील उदगाव वेस, जिजामाता उद्यान आण्णाभाऊ साठे पुतळ्यासमोरील पावसाळी पावसाचा निचरा करण्यासाठी चेंबर बंद करुन, S.T. डेपो ते S.T.स्टॅण्ड कडे जाणारा रस्त्याच्या मध्ये क्रॉस पाईप लाईन टाकून मुस्लीम स्मशानभूमी व S.T.स्टॅण्ड यामधील वॉल कंपौडच्या लागून नव्याने पाईप लाईन टाकून अथवा गटार करुन, पुढे रेल्वे लाईन खाली असणाऱ्या नैसर्गिक नाल्यास पावसाळी पाणी जोडलेस आण्णाभाऊ साठे पुतळा व परिसरातील नागरी वस्तीमध्ये पाणी साचून राहणार नाही. यासाठी प्लॅन व एस्टीमेट तयार करुन कामगिरी करुन घेणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मेंहुद्दीन बागवान. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. जगन्नाथ ठोकळ. महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२३

ठराव क्रमांक :- ३२९

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.गिता सुयोग सुतार यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सांगली वॉर्ड क्र.१७ मधील सि.स.नं.१२२३२ येथील मनपाच्या ओपन स्पेसमध्ये कुस्ती आखाडा व सभागृह विकसीत करणेत आले आहे सदर कुस्ती आखाडा व सभागृहास जकार्तावीर हिंदकेसरी पै.मारुतीभाऊ माने कुस्ती आखाडा असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान

अनुमोदक :- श्री.शेडजी मोहिते

D.Y. Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३३०

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विनायक रमेश सिंहासने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सांगली वॉर्ड क्र.१९ मधील कुंभार मळा येथील रस्त्याच्या पश्चिमेला असलेल्या भागास गजराज कॉलनी असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी नगरसचिव विभागाकडे विषयपत्र प्राप्त झाले असून, त्यानुसार सांगली वॉर्ड क्र.१९ मधील कुंभार मळा येथील रस्त्याच्या पश्चिमेला असलेल्या भागास गजराज कॉलनी असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.उत्तम बाळकृष्ण साखळकर यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील हिराबाग येथे विकसीत केलेल्या परिसरात प्रतिष्ठित व्यापारी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै.बाबासाहेब सावंतआप्पा बोरगावे असे नामकरण करणेस अंतिंम मान्यता देणेकामी नगरसचिव विभागाकडे विषयपत्र प्राप्त झाले असून, त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील हिराबाग येथे विकसीत केलेल्या परिसरात प्रतिष्ठित व्यापारी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै.बाबासाहेब सावंतआप्पा बोरगावे ऐवजी कै.बापूसाहेब सावंतआप्पा बोरगावे असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर.

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने.

ठराव सर्वानुमते मंजुर

D. Suryavanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२ २७।१०।२०२२

ठराव क्रमांक :- ३३१

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विनायक रमेश सिंहासने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका सांगली वॉर्ड क्र.१९ मधील सावरकर कॉलनी येथील स.नं.९४४० मधील खुल्या भुखंडाला पंडीत दीनदयाल उपाध्याय असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी नगरसचिव विभागाकडे विषयपत्र प्राप्त झाले असून, त्यानुसार सांगली वॉर्ड क्र.१९ मधील सावरकर कॉलनी येथील स.नं.९४४० मधील खुल्या भुखंडाला पंडीत दीनदयाल उपाध्याय असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र लक्ष्मण कुंभार यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१७ मध्ये महानगरपालिकेच्या वतीने सुरु करणेत आलेल्या मध्यवर्ती निदान केंद्र (एक्स-रे आणि लॅबोरेटरी) ला महात्मा बसवेश्वर महाराज मध्यवर्ती निदान केंद्र असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी नगरसचिव विभागाकडे विषयपत्र प्राप्त झाले असून, त्यानुसार वॉर्ड क्र.१७ मध्ये महानगरपालिकेच्या वतीने सुरु करणेत आलेल्या मध्यवर्ती निदान केंद्र (एक्स-रे आणि लॅबोरेटरी) ला महात्मा बसवेश्वर महाराज मध्यवर्ती निदान केंद्र असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.राजेंद्र कुंभार

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३३२

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.सविता दादासो मदने आणि सौ.अप्सरा महेंद्र वायदंडे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सांगली वॉर्ड क्र.१९ मधील ढेरे मळा,बेळे कॉलनी,वानलेसवाडी अंतर्गत भागात आठवडा बाजार सुरु करणेबाबत नागरिकांची वारंवार मागणी होत आहे. सदर परिसरातील नागरिकांना आठवड्याचा बाजार करणेसाठी दुर अंतरावर जावे लागत आहे. या भागातील समतानगर, लक्ष्मीनगर, मिरजवाडी, रुक्मिणी मार्केट, ढेरे मळा वानलेसवाडी या भागातील नागरिकांच्या सोईसाठी आठवडा बाजार सुरु करणेस पोलिस प्रशासन,जिल्हा प्रशासन यांचा नाहरकत दाखला घेवून, प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करावा ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- सी.मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi

अनुमोदक सी.शेडजी सोहिते. महापौर,

सहा.आयुक्त (प्र.ज.क्र.३)

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२ २७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३३३

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकमध्ये आस्थापवनेवर बदली,मानधन,रोजंदारी व संपकालीन कर्मचारी कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांनी मनपाची मनोभावे सेवा केलेली असून, महानगरपालिकेत भविष्यात कायम नोकरी मिळेल या आशेने प्रामाणिकपणे काम करीत आहे. या कर्मचाऱ्यांना मनपा सेवेत कायम करुन घेणेसाठी मा.महाराष्ट्र शासनास प्रस्ताव पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.सैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री.जगन्नाथ ठोकळे. महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३३४

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका शाळा क्र.४२ मध्ये कै.शौकतअली गुलाब मुल्ला हे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. कै.मुल्ला हे सेवेत असताना दि.१२/१२/२००७ रोजी त्यांचे आकस्मिक निधन झालेने त्यांचे जागेवर त्यांचा मुलगा श्री.अमीर शौकतअली मुल्ला यांना शिक्षण मंडळ मनपाकडे सेवेत सामावून घेणेस दि.१८/०४/२०२२ ठराव क्र.२०३ अन्वये ठराव पारित झालेला होता. सदर ठरावामध्ये श्री.अमीर शौकतअली मुल्ला यांना शिक्षण मंडळ मनपा अथवा महानगरपालिकेच्या आस्थापनावर सामावून घेणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.विष्णू माने ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

अनुमोदक :- Tshih श्री. नोफिक शिकलगार महापौर,

प्रज्ञा.आधी (शिक्षण)

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३३५

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.निरंजन सुरेश आवटी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील प्र.क्र.४ कुरणे कावरे मळा येथील सार्वजनिक शौचालय पाडणे अत्यंत आवश्यक आहे.सदर परिसरातील सार्व.शौचालयापासून ये-जा.करणे अडचणीचे होत आहे. याचा परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक होवून दुर्गंधी पसरलेली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास हानीकारक असल्यामुळे त्या परिसरातील नागरिकांचेकडून सार्व.शौचालय पाडणेची मागणी होत आहे. त्यानुसार सदरचे शौचालय पाडणेबाबत प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान.

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते.

महापौर,

वै.आ.अ.

महापालिका सचिव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३३६

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.भारती हेमंत दिगडे आणि सौ.स्वाती नितीन शिंदे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासन पुरस्कृत अमृत-२ अभियान योजनांतर्गत सांगली व कुपवाड शहर पाणी पुरवठा योजना करिता मुळ योजना मध्ये समावेश असलेल्या वारणा उदभव योजना करीता समडोळी अगर चांदोली (वारणा) धरण स्त्रोत धरुन प्रकल्प अहवाल तयार करणेबाबतचा धोरणात्मक निर्णय होणे तसेच माळबंगला येथे नविन जलशुद्धीकरण केंद्र बांधणे,गावठाण हद्दीमध्ये जुनी व कालबाह्य झालेली वितरण व्यवस्था बदलणे व सांगली शहराच्या विस्तारीत भागात ३ नविन उंच टाक्या बांधणे या कामाचा समावेश अमृत २.० योजनेंतर्गत मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेसाठी धोरणात्मक निर्णयासाठी नगरसचिव विभागाकडे विषयपत्र प्राप्त आहे. त्यानुसार निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या गावठाण व विस्तारीत भागात झपाट्याने होत असलेली वाढ लक्षात घेवून सांगली शहर सुधारीत व कुपवाड शहर वाढीव पाणी पुरवठा योजना केंद्र शासनाचे युआयडीएसएसएमटी मधून २००६ साली मंजूर होवून या अंतर्गत महापालिकेची सन २०४० ची लोकसंख्या गृहीत धरुन नविन ७० एम एल डी जलशुद्धीकरण केंद्र बांधणे, अस्तित्वातील ३६ एम एल डी केंद्राची क्षमता वाढवून ५६ एम एल डी करणे, जुन्या टाक्यांची दुरुस्ती करणे,जॅकवेल ते माळबंगला जुनी रायझींग मेन बदलणे,कुपवाड भागासाठी आठ टाक्या बांधणे, सांगली शहरातील विस्तारीत भागासाठी नविन उंच टाक्या बांधणे, अनुषंगिक पंपींग मशिनरी उभा करणे इत्यादी कामे पुर्ण होवून पाणी पुरवठा करणेत आलेला आहे. तथापि, सदर योजनेतील मुळ प्रस्तावा प्रमाणे उद्भव म्हणून वारणा नदीवर समडोळी येथे बंधाऱ्या मागे हेडवर्कस्, अनुषंगिक रायझींग मेन,पंप हाऊस व मशिनरी कृष्णा नदीवर ट्रस ब्रिज बांधणे इत्यादी प्रस्तावित कामे वगळणेत येवून, त्याऐवजी मुळ प्रस्तावामध्ये तांत्रिक बदल करुन, कुपवाड व वानलेसवाडी शहरासाठी मुळ प्रस्तावामध्ये असलेल्या तरतुदी कायम ठेवून, समडोळी येथील हेडवर्कस् व अनुषंगिक कामा ऐवजी कृष्णा नदी ते माळबंगला पर्यत रॉ-वॉटर रायझींग टाकणे व इतर अनुषंगिक कामे सन २०२५ ची लोकसंख्या गरज लक्षात घेवून, तांत्रिक बदलानंतर वाढीव सुधारीत सांगली,कुपवाड नळ पाणी पुरवठा योजनेस महासभेने मान्यता दिली होती व सदर कामे पुर्ण झालेनंतर गरज भासल्यास वारणा उद्भव योजनेशी संबंधीत उर्वरित कामे भाग-२ मध्ये समाविष्ठ करुन मा.शासनाकडे मंजुरीस पाठविणेस मान्यता देणेत आलेली होती. तथापि या बाबत निर्णय झालेला नाही.

महापालिका क्षेत्रातील नागरिकांना स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठा होणेसाठी वारणा नदीतून पाणी उचलणेची वारणा उद्भव योजना कार्यान्वीत होणेसाठी महापालिकेच्या विविध बैठकामध्ये सन्मा.सदस्यांकडून मागणी करणेत येत असून, महापालिका क्षेत्रातील विविध संघटना यांचे मार्फत ही वारणा उद्भव योजना ही पूर्ण करणेची मागणी होत आहे. तसेच, महापालिका क्षेत्रातील काही सामाजिक संघटना यांचेकडून उद्भवाचे ठिकाण चांदोली (वारणा धरण) धरुन केंद्र शासन पुरस्कृत अमृत -०२ या योजनेमधून थेट धरणातून पाणी घेणेबाबतही मागणी होत आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन, सांगली व कुपवाड शहराच्या भविष्यातील शुद्ध व मुबलक पाणी पुरवठा व्यवस्थेसाठी वारणा नदीतून थेट पाणी उचलून वारणा उद्भव योजना पूर्ण करणेस ही सभा मान्यता देत असून, यासाठी समडोळी येथील वारणा नदी काठावरील जॅकवेलची जागा निश्चित करुन माळबंगला पर्यत पाणी आणणे तसेच, माळबंगला येथे जुने ५६ एम एल डी जलशुद्धीकरण केंद्र निष्काशित करुन नविन जलशुद्धीकरण केंद्र बांधणे, सांगली शहरातील जुना गावठाण,गावभाग,खणभाग तसेच शहरातील इतर ठिकाणची जुनी कालबाह्य झालेली संपुर्ण वितरण व्यवस्था बदलणे त्याचबरोबर सांगली शहरामध्ये शामराव नगर, दत्तनगर,धामणी रस्ता,कर्नाळ रस्ता, गावभाग, या ठिकाणी आवश्यकतेनुसार उंच टाक्या बांधणेस ही सभा मान्यता देत असून, सदरची योजना शासनाच्या अमृत -०२ अंतर्गत मान्यतेस पाठविणेसाठी योजनेचे सविस्तर अंदाजपत्रके,आराखडे तयार करणेबाबतच्या मा.शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सदर कामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रकल्प सल्लागारांचे प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या सोळा संस्था पैकी कोणत्याही एका संस्थेची निवड करणेसाठी अधिक्षक अभियंता म.जि.प्रा.यांचे दि.०८ एप्रिल २०२१ चे परिपत्रक व तसेच केंद्र पुरस्कृत अभियानांतर्गत प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.अमृत-२०२२/ प्र.क्र२०३/ नवि-३३ दि.१६ सप्टेंबर २०२२ रोजीचे परिपत्रकान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची (PMC) एकूण १६ संस्थांची नामिका (empanelment) तयार केली असून, त्यापैकी कोणत्याही एका संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून निवड करणे अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सल्लागार नेमणे (PMC), महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रकल्प किंमत निहाय वर्गवारी करुन अमृत प्रकल्पांना कमाल ३% मर्यादित PMC शुल्क अदा करणेस ही सभा आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे. त्याच प्रमाणे वारणा उद्भव योजनेच्या समडोळी येथील जॅकवेलची जागा व उंच टाक्यासाठीची जागा निश्चित करुन,खाजगी वाटाघाटीने जागेचे भूसंपादन करणेस व योजनेच्या अनुषंगाने इतर कामगिऱ्या करणेसाठीही ही सभा आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

तरी सदरची वारणा उद्भव योजना अमृत -०२ योजनेंतून मंजूर होणेसाठी प्रस्ताव मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक

सौ. भारती दिगडे.

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi.

महापौर,

महानगरपालिका सांगली

अनुमोदक

श्री. मैनुद्दीन बागवान.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३३७

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

भारत अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय यांचे वतीने देशातील अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रधामंत्री जनविकास कार्यक्रम (पी.एम.जे.व्ही.के.) अंतर्गत सन २०१४ मध्ये शासन निर्णय करणेत आला व त्यानुसार महाराष्ट्रातील ज्या शहरांचा अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र म्हणून समावेश करणेत आला. त्यामध्ये सां.मि.कु.महानगरपालिकेचा समावेश करणेत आला आहे. तरी सदर योजर्नेतर्गत महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्या मंजूर अंगणवाड्या आहेत परंतु सदर अंगणवाड्या यांना स्वत:ची इमारत नाही अशा अंगणवाड्या बांधकामासाठी सदर योजनेमधून निधी उपलब्ध होत असून, महानगरपालिका क्षेत्रामधील ज्या-ज्या अंगणवाड्यासाठी जागा उपलब्ध करुन बांधकाम करता येणे शक्य आहे. त्यानुसार महापालिका क्षेत्रामधील ज्या अंगणवाड्यांना स्व:ताची इमारत नाही व ज्या अंगणवाड्या भाड्याच्या जागेत आहेत अशा अंगणवाड्यांचा बांधकाम अनुदान मिळणेसाठीचा प्रस्ताव अल्पसंख्यांक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम (पी.एम.जे.व्ही.के.) अंतर्गत मा.अल्पसंख्यांक विकास मंत्रालय,मुंबई यांना पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Surlavanshi
महापौर,

अनुमोदक :- श्री. विष्णू माने

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३३८

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.सविता दादासो मदने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सांगली वॉर्ड क्र.१९ मधील ढेरे मळा येथील स.नं.३३ मध्ये इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सांगली शहरामध्ये सर्व सोयींनियुक्त वस्तीगृह बांधणेची समाज बांधवांची इच्छा आहे. यासाठी समाजातील समाज बांधव वारंवार मागणी करीत आहेत. इतर मागास प्रवर्गातील होतकरु विद्यार्थ्यांसाठी महापालिका क्षेत्रामध्ये वस्तीगृह बांधणेसाठी शासन निधी उपलब्ध होवून मिळणेसाठी महाराष्ट्र शासनाचे इतर मागास बहूजन कल्याण विभागाकडे निधी मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत असून, सदर कामी प्रशासनाने पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.धिरज चंद्रकांत सुर्यवंशी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचे सांगली येथे मा.दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह आहे. सदरचे नाट्यगृह हे सन २०१९ मध्ये आलेल्या महापुरामध्ये पुराच्या पाण्यामुळे खराब होवून नाट्यगृहाची पुर्णत: दुरावस्था झालेली असून, सदरचे नाट्यगृह दुरुस्ती करणेसाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता असलेने व महापालिकेची आर्थिक परिस्थिती बेताची असलेने सदरचे नाट्यगृह आजपावेतो बंद आवस्थेत आहे. त्यामुळे सांगलीतील नाट्यप्रेमींची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. सांगलीचा नावलौकीक नाट्यपंढरी म्हणून संपूर्ण राज्यामध्ये असताना, नाट्यगृहा अभावी सांगलीची नाट्यप्रेमींची होणारी गैरसोय टाळण्यासाठी सांगली मध्ये एक नविन अद्यावत सुसज्ज सर्व सोईनियुक्त असे नाट्यगृह व बहुउद्देशिय हॉल बांधकाम करणे योग्य होईल असे या सभेचे मत आहे.

मा.राज्य शासनाकडून नुकतेच राज्यामध्ये नाट्यगृह बांधकाम करणेसाठी भरीव विशेष अनुदान देणेची घोषणा करणेत आलेली आहे. त्यानुसार महापालिकेचे सांगली येथे नविन नाट्यगृह बांधकाम करणेस सांगली येथील स.नं.३३४ मधील शिल्लक जागा निश्चित करणेत येत आहे. सदर जमीन मंजूर विकास योजनेनुसार दक्षिणेस पूर्वपश्चिम नियोजीत १८.३० मी. रस्त्याने बाधीत होते व काही भाग आ.क्र.१५४ ऑफिस व शॉपिंग कॉम्प्लेक्स मध्ये व उर्वरित भाग आ.क्र.१५३ स्पोर्टस सेंटर या आरक्षणामध्ये समाविष्ठ आहे. सदर जमिनीच्या ७/१२ पत्रकी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे नाव नमुद असून, एकूण क्षेत्र हे ६.२० आर इतके आहे. पैकी जमिनीच्या पश्चिम बाजूस एसटीपी क्षेत्रावर विकसीत झालेले असून,उर्वरित क्षेत्र खुले आहेत.

महानगरपालिकेने स्पोर्टस सेंटर या आरक्षणामध्ये महासभा ठराव क्र.२८० दि.१८/०८/२०२२ अन्वये मनपा कर्मचाऱ्यांसाठी क्लब मनोरंजनात्मक बाबीसाठी ठराव मंजूर करणेत आलेला आहे. मा.शासनाने मंजूर केलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीनुसार नियमन क्र.४.२७ मधील (३) नुसार विकास आराखड्यामध्ये विशिष्ट उद्देशासाठी आरक्षित असलेल्या कोणत्याही जागेस शासनाच्या परवानगीने इतर कोणत्याही सार्वजनिक हेतूसाठी विकसीत करण्याची परवानगी दिली जावू शकते असे करताना बांधकाम करण्यायोग्य आरक्षणे ही बांधकाम योग्य आरक्षणे ही बांधकाम योग्य किंवा खुल्या करमणुकीच्या वापरासाठी उर्वरित क्षेत्रावर लागू केले जावू शकते त्या अनुषंगाने मा.शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवून सदर खुल्या जागेत एक नविन अद्यावत सुसज्ज सर्व सोईनियुक्त असे नाट्यगृह व बहुउद्देशिय हॉल बांधकाम करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उपरोक्त प्रमाणे स.नं.३३४ या जागेवर महापालिकेचे अत्याधुनिक सर्व सोईनियुक्त सुसज्ज असे नाट्यगृह उभे करण्यासाठी महापालिका महापालिका पॅनेल वरील वास्तुविशारद श्री प्रमोद चौगुले यांचेकडून ५८३६.४५ स्क्वे.मी. मध्ये नाट्यगृह बांधकामाचा नकाशा व आराखडा तयार करुन घेणेत आलेला असून, त्यानुसार सदर कामी र.रु.३७,५०,८२,०६४/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रक होत असून, त्यास ही सभा मान्यता देत असून, सदर नाट्यगृह बांधकाम करणेसाठी प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी प्रस्ताव मा.शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस हो सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान.

अनुमोदक :- श्री. धिरज सुर्यवंशी.

ठराव सर्वानुमते मंजुर

D P Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका

मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२
२७/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३३९

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका मा.महासभा ठराव क्र.८२ दि.२०/०१/२०२१ अन्वये भारत सरकार अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय यांचेवतीने प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम (पी.एम.जे.व्ही.के.) अंतर्गत उपसूचेनद्वारे मनपातील अल्पसंख्यांक बहूल क्षेत्रातील आठ कामांचा प्रस्ताव मा.महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विभाग मुंबई यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी पाठविणेस मान्यता देणेत आलेली होती. सदर उपसूचनेद्वारे दिलेल्या आठ कामांमधील अ.क्र.४ कुपवाड स.नं.२००/२ब या मनपाच्या जागेमधील ३० गुंठे जागेत सदभावना मंडप बांधणे या कामाधील कुपवाड स.नं.२००/२ब या ऐवजी जुना कुपवाड स.नं.२००/२ब/१ खुली जागा, नविन स.नं.१५२/२/ब/१ या मनपा खुल्या जागेत सदभावना मंडप बांधणे कामीचा प्रस्ताव मा.महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विभाग मुंबई यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरीसाठी मान्यतेस सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मेहबुबीन बागवान. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शेडजी मोहिते.

D.P.Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सांगली
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३४०

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.फिरोज हुसेन पठाण यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६७ अ अन्वये अवैध इमारतीवर शास्ती बसविण्याची तरतुद समाविष्ठ आहे. सदरचे बांधकाम जोपर्यत अवैध म्हणून राहिल तोपर्यत दरवर्षी अशा इमारतीवर बसविण्या योग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती बसवण्यास पात्र असेल.

असे असले तरी शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.३०५/नवि/२० नुसार अनाधिकृत बांधकामांना उपरोक्त प्रमाणे शास्ती आकारणी करणेत आलेनंतर ती शास्ती संबंधीत खेरदीधारकाकडून वसुल केले जाते. खरेदीदाराची कोणतीही चुक नसताना शास्ती भरावी लागते. या पार्श्वभूमीवर तरतुदीत सुधारणा करुन त्या अनुषंगाने मुंबई प्रांतिक व महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अद्यादेश २०१७ क्र.३ दि.०८/०१/२०१७ अन्वये महाराष्ट्र मनपा अधिनियमामध्ये सुधारणा करणेत आली असून, शास्तीचे अधिकार महानगरपालिकांना देणेत आले आहेत.

वरील सुधारित अधिकारान्वये महानगरपालिका क्षेत्रातील गुंठेवारी विभाग वगळून अधिनियमातील सुधारीत तरतुदी नुसार अंमलबजावणी करणेत यावी व गुंठेवारी क्षेत्रातील सविस्तर अहवाल तयार करुन गुंठेवारी समिती मार्फत सदर तरतुदींची अंमलबजावणी करावी अगर कसे याबाबत गुंठेवारी समितीच्या शिफारशीनु मान्यतेसाठी अहवाल सादर करणेत यावा असे मा.महासभा ठराव क्र.७८ दि.१९/११/२००८ ने आदेशित केले आहे.

यानुसारच मा.आयुक्तसो यांनी देखील गुंठेवारी क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रास घरपट्टीचे दुप्पट दराने शास्ती करुन अवैध बांधकामावर आकारणी करण्यास दि.३१/०३/२०१२ रोजी मंजूरी दिली आहे. त्यानुसार सन २०१७-१८ पर्यत आकारणीचे काम सुरु होते.

सन २००८ चा मा.महासभेचा ठराव व मा.आयुक्तसो यांचे गुंठेवारी क्षेत्र वगळून शास्तीची आकारणी करणेच्या मान्यता झालेनंतर मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२७/०९/२०१८ च्या अधिनियमान्वये सर्व नगरपरिषदा,नगरपंचायतीमध्ये एक वाक्यता असावी व अल्प उत्पन्न घटकांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून तसेच अनाधिकृत निवासी बांधकामावर प्रभावी आळा बसविण्याकरीता शास्तीची आकारणी करण्याबाबत राज्यातील सर्व नगरपरिषद / नगरपंचायतींना निदेश देणेत आले आहेत.

उपरोक्त अधिनियमामध्ये महानगरपालिकांचा / सां.मि.कुमनपाच्या नावाचा कुठेही साधा नामोल्लेख नसतानाही अधिनियमाचा गैरअर्थ काढून गुंठेवारी क्षेत्रातील मालमत्ता धारकांना जबरदस्तीने व मा.महासभा ठराव मा.आयुक्तसो यांचे आदेशांचा अवमान करुन सन २००८ चा ठराव विखंडीतही न करता बेजबाबदारपणे शास्ती लावून वसुलीचा घाट घातला आहे. तो गैर असून बेकायदेशीर व मा.महासभेच्या तसेच मा.आयुक्तसो यांच्या झालेल्या निर्णयाचा अवमान करणारा आहे. गुंठेवारी मधील नागरिकांनी त्यांच्या मालमत्ता पै-पै गोळा करुन उभ्या केलेल्या असतात अशातच अद्याप गुंठेवारीमध्ये बऱ्याच सोयी-सुविधा अपुऱ्या असलेने ही शास्ती म्हणजे गुंठेवारीतील नागरिकांवर अन्यायच होणार आहे.

तेंव्हा बेकायदेशिर लावली जाणारी शास्ती सत्वर थांबवून दि.१९/११/२००८ च्या मा.महासभेने पारित केलेला ठराव व मा.आयुक्तसो यांनी दिलेली मान्यता कायम करुन गुंठेवारी क्षेत्रातील सर्वच मालमत्तांना शास्ती लावणेत येवू नये. याबाबतचा सविस्तर अहवाल प्रशासनाने सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक

महापौर,